भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०८/२०१७

**१) एचपी गॅस एजन्सीच्या शोरुमधील साहित्याची चोरी :–**

दिनांक १२/०८/२०१७ चे २०.३० वा.ते दि. १४/०८/१०७ चे ००.३० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन श्री. प्रभुदत्त एचपी गॅस एजन्सीच्या शोरुमच्या मागील शर्टस लॉक तोडुन आत मध्ये प्रवेश केला व त्यामधील कम्प्युटर कॅनान कंपनीचा, १० सेंगडी असलेला १ बॉक्स, खुले १० रेगुलेटर, सोलर उर्जेचे १० लॉईट, सिमचे २ इंटरनेट, डोंगल वोडाफोन कंपनीचे सीम असलेला एक इंन्टेक्स कंपनीचा मोबाईल, कॅश, कॉउन्टरचे डावर मधील अंदाजे ५०,०००/–रु. असा एकुण १,९५,२५०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी मनोज गंगाधर उके वय ४३ वर्ष, रा. जाम यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. गुरनुले पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) प्राणी निदर्यतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०८/२०१७ चे ११.०० ते १३.३० वा. दर. यातील आरोपीतांनी आपल्या ताब्यातील ट्रक क्र. एनएल ०२/७३१७ मध्ये आरोपीतांनी थांबविले असता जनावराचा मालक आरोपी क्र. ४ व त्याच्या दोन सोबत्यांनी फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट केली सदर ट्रक हा मौदा पोलीसांच्या मदतीने पकडुन भंडारा येथे आणले असे फिर्यादी शैलेश सुरेद्र श्रीवास्तव वय ३२ वर्ष, रा. स्वामी विवेकानंद वार्ड भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,३२३,२८९ भादंवि. सहकलम ११(१) (ड) प्रा. कृ. वा प्रति. कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०८/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही पुस्तक घेण्याकरीता बाजारात गेली असता घरी परत आली नाही तिला आरोपीने फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १४/०८/२०१७ चे १८.१२ वा. दर. यातील मृतक विठ्ठल गणेश पाटील वय ५७ वर्ष, रा. खोकरला दिनांक १४/०८/२०१७ ला अचानक प्रकृती बिघाडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे आकस्मीक विभागात आणले असता तेथील डॉक्टरने ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टर मेमो व मृतकचे मुलाचे बयाना वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु. :—

दिनांक १३/०८/२०१७ चे १३.५५ वा. दर. यातील मृतक प्रशांत मधुकर पडोळे वय ४५ वर्ष, रा. गुरुनानक वार्ड तुमसर हा दारु पिण्याचा सवईचा असुन १३/०८/२०१७ ला १०.०० वा घरुन गेला व १८.०० वा. दरम्यान माकडे नगर येथील नाग मंदीरा जवळ पडुन असल्याची माहीती मिळुन आल्याने त्यास उचलुन घरी आणले असता घरी त्याची प्रकृती जास्त बिघडल्याने त्यास सु. बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी सौ. मेघा प्रशांत पडोळे वय ३० वर्ष, रा. गुरु नानक वार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

६) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—

दिनांक १३/०८/२०१७ चे १३.२५ वा. दर. यातील मृतक ग. भा. मिना अशोक रोडगे वय ३५ वर्ष रा. फुलमोगरा ही कॅन्सरचे आजाराने त्रस्त असल्याने तीने तेजा नावाची विषारी औषध प्राशन केल्याने तीस औषधोपचारा करीता दिनांक ११/०८/२०१७ ला सा. रु भंडारा येथे भरती केले व पुढील उपचारास तेथुन रेफर केल्याने दिनांक १२/०८/२०१७ ला मेडीकल कॉलेज नागपुर येथे २०.१५ वा. भरती करुन उपचार सुरु असतांना दिनांक १३/०८/२०१७ ला मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. साखरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

७) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक १४/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे जवाहरनगर, कारधा, वरठी, लाखनी व लाखांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५६ लिटर हा.भ. दारू+ नगदी १२००/—रु. किंमती ४९००/—रु. व ८ लिटर ६४० मिली लिटर देशी दारु+ १ मोटार सायकल किंमती ४२४००/—रु. असा एकुण कि. ४७३००/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १४/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवसी ०३ तीन सिटर वाहनांवरती ६४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.